# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषय :** विद्यापीठातील ज्या सेवकांनी लॅपटॉप खरेदीसाठीच्या कर्ज योजनेचा लाभ यापूर्वी घेतलेला नाही अशा कायम सेवकांसाठी तसेच जाहिरात क्र. २७ दि. २२.०६.२०१३ ला अनुसरुन नेमणूक झालेल्या सेवकांसाठी आणि ज्या सेवकांची विद्यापीठ निधीतून किमान २० वर्षासाठी निर्माण केलेल्या पदावर नेमणूक झालेली आहे अशा सेवकांसाठी पुनश्चः कर्जयोजना राबविणेबाबत...

या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, **लॅपटॉप खरेदीसाठीच्या कर्ज योजनेचा लाभ यापूर्वी घेतलेला नाही अशा कायम सेवकांसाठी तसेच जाहिरात क्र. २७ दि. २२.०६.२०१३ ला अनुसरुन नेमणूक झालेल्या सेवकांसाठी आणि ज्या सेवकांची विद्यापीठ निधीतून किमान २० वर्षासाठी निर्माण केलेल्या पदावर नेमणूक झालेली आहे अशा सेवकांसाठी** बँक ऑफ महाराष्ट्र, विद्यापीठ परिसर शाखेमार्फत पुनश्चः कर्ज योजना राबविण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला आहे.

**या योजनेचे सर्वसाधारण नियम व अटी खालीलप्रमाणे राहतील.**

१. लॅपटॉप खरेदीसाठीच्या कर्ज योजनेचा लाभ यापूर्वी घेतलेला नाही अशा कायम सेवकांसाठी तसेच जाहिरात क्र. २७ दि. २२.०६.२०१३ ला अनुसरुन नेमणूक झालेल्या सेवकांसाठी आणि ज्या सेवकांची विद्यापीठ निधीतून किमान २० वर्षासाठी निर्माण केलेल्या पदावर नेमणूक झालेली आहे अशा सेवकांसाठी सदर योजना लागू राहील.

२. कर्जाची रक्कम जास्तीत जास्त रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) किंवा लॅपटॉपची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढीच असेल.

३. सदर कर्ज हे सेवकाच्या विद्यापीठ सेवेतील कालावधीत एकदाच अनुज्ञेय राहील.

४. सदर योजनेमार्फत मंजुर करण्यात येणा-या कर्जास बँक ऑफ महाराष्ट्रचे नियम व अटी लागू राहतील.

..२..

५. विद्यापीठ सेवकावर शिस्तभंगाची कारवाई होऊन त्यांना कोणतीही जबर शिक्षा(major penalty) अथवा कोणतीही किरकोळ शिक्षा(minor penalty) झालेली नसावी. परंतु शिक्षा झालेल्या सेवकांस शिक्षा झाल्याच्या दिनांकापासून पाचवर्षापर्यंत सदर योजनेचा लाभ देय होणार नाही. मात्र असा सेवक न्यायालयाच्या निर्णयाद्वारे दोषमुक्त ठरल्यास अथवा शिस्तभंग विषयक कारवाईमध्ये निर्दोष ठरल्यास अशावेळी त्यांना सदर लाभ देय राहील.

६. कर्ज योजनेचा कालावधी ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत लागू राहील.

७. कर्जाचा कालावधी जास्तीत जास्त ३ वर्ष इतका राहील.

८. लॅपटॉप खरेदीसाठीच्या कर्जावरील व्याजाचा भार विद्यापीठावर राहील व मुद्दल रकमेची परतफेड संबंधित सेवकास बँकेच्या नियमानुसार करावी लागेल.

९. बँकेमार्फत कर्ज वितरीत केल्यानंतर कर्जाच्या रकमेचा मासिक हप्ता संबंधित सेवकाच्या वेतनातून कपात करुन बँकेस अदा केला जाईल.

१०. कर्ज योजनेसंबंधी अधिक माहितीसाठी सेवकांनी बँक ऑफ महाराष्ट्र, विद्यापीठ परिसर शाखेशी संपर्क साधावा.

15/11/2018

(सीए अतुल पाटणकर)
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे ४११००७
जा.क्र.वित्त/२०१८-१९/१२८८
दिनांक : १५ नोव्हेंबर, २०१८

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

| | |
|---|---|
| १. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास प्राधान्याने सदरचे परिपत्रक आणावे. |
| २. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | |